# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३८/२००७/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. ब्रम्हदेव दगडू नलवडे,<br>मु. बाळेवाडी, पो. बोरगांव,<br>ता. करमाळा, जि. सोलापूर. | अपेलंट |
| **<u>विरूध्द</u>** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>संवसु मंडळ कार्यालय, जुने मिल कंपाऊंड,<br><u>सोलापूर.</u><br><br>२) कार्यकारी अभियंता(संवसु)<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br><br>सं.व सु. विभाग<br>बार्शी, जिल्हा–सोलापूर.<br><br>३) सहाय्यक अभियंता (संवसु),<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु उपविभाग, करमाळा, जिल्हा–सोलापूर.<br><br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**<u>कोरम</u> :–** १) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. ब्रम्हदेव दगडू नलवडे, मु. बाळेवाडी, पोष्ट–बोरगांव, जिल्हा–सोलापूर यांनी आपल्या मालकीच्या शेती क्षेत्र गट क्र. १०८ मधील विंधन विहिरीवर / बोअरवेल वर ५ अश्वशक्ती शेती पंपास नवीन वीज पुरवठा न मिळाल्याबाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सोलापूर येथे विहित नमुन्यात तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने दि. ३०–०७–२००७ रोजी दिलेल्या निर्णय मान्य न झाल्याने त्यांनी प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले आहे.

अपीलदाराचे तक्रारीचे सर्वसाधारण स्वरूप खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते –

श्री. नलवडे यांनी त्यांच्या मालकीच्या गट क्र. १०८ मधील विंधन विहिर बोअरवेलवर ५ एच.पी. शेती पंपास वीज कनेक्शन मिळणेस वि.प. यांचेकडे मागणी केली होती. त्याकामी प्रकरणास मंजुरी देणेत येऊन वि.प. यांनी दिलेल्या कोटेशन क्र. ९२३७ नुसार तक्रारदार यांनी रक्कम रू. ६४७०/– पत्र क्र. २२९२७ दि. १८–१०–२००२ रोजी अदा केली. तथापि वेळोवेळी पाठपुरावा करूनही त्यांचे शेती पंपास अद्यापि वीज पुरवठा करण्यात आलेला नाही.

प्रकरणी सुनावणीची तारीख २८–११–२००७ रोजी दु. ३–०० वा. म.रा.वि.वि.कं.लि., विभागीय कार्यालय बार्शी येथे ठेवण्यात आली. प्रत्यक्ष सुनावणी कर्मचारी पतसंस्थेचे कार्यालयात पार पडली. सदरचेवेळी तक्रारदार श्री. ब्रम्हदेव दगडू नलवडे हे स्वत: उपस्थित होते. वि.प. यांचेवतीने श्री. एम.बी. भाजीभाकरे, कार्यकारी अभियंता विभाग बार्शी, श्री. एन.के. मोरे, सहाय्यक अभियंता, करमाळा उपविभाग व श्री पी.आर. गोस्वामी, कनिष्ठ अभियंता हे उपस्थित होते. सुनावणीचेवेळी तक्रारदार श्री. नलवडे यांनी सांगितले की त्यांनी त्यांचे मालकीचे गट क्र. १०८ मु. बाळेवाडी, ता. करमाळा येथील बोअरवेल वर ५ अश्वशक्ती शेती पंपास विद्युत कनेक्शन मिळणेस विहित नमुन्यात वि.प. कडे अर्ज केला होता. त्यास अनुसरून वि.प. यांनी पाठविलेल्या कोटेशन क्र. ९२३७ प्रमाणे त्यांनी रू. ६४७०/– चा भरणा केला आहे. तसेच वीज मोटार पंप बसविलेचा चाचणी अहवाल सादर केला आहे. विद्युत कनेक्शन मिळणेस वि.प. कडे अनेकवेळा पाठपुरावा करूनही वि.प. कडून चालढकल करण्यात आली. चाचणी अहवाल दिला असूनही, तो विचारात न घेता दि. ७–८–२००७ ला दुसरा चाचणी अहवाल देणेस भाग पाडले. अद्याप वीज कनेक्शन मिळाले नाही म्हणून वीज कनेक्शन मिळावे व यापोटी शेती उत्पन्न घेऊ न शकलेमुळे आर्थिक नुकसान भरपाई रू. २५०००/– मिळावी व त्यावरील व्याज मिळावे, विहिरीसाठी झालेला खर्च व्याजासह व बाळेवाडी पासून करमाळा / बार्शी पर्यंत हेलपाटे झालेचा प्रवास खर्च मिळावा.

वि.प. चे वतीने श्री. मोरे, सहाय्यक अभियंता यांनी सांगितले कि सदर अर्जदाराचे कनेक्शन १३ शेती पंपाचे एकत्रित गटामध्ये मंजुर आहे व सदर कामास एच.टी. / एल.टी. वाहिनी व रोहित्र टाकावे लागणार आहे. अशा शेती पंपाचे गटाची कामे यादीप्रमाणे सुरू असून अद्याप श्री. नलवडे असलेल्या गटाचे कामाचा क्रमांक आलेला नाही.

विद्युत साहित्याची कमतरता असलेने नवीन वाहिन्याची कामे रखडली आहेत. अर्जदाराने पूर्वी टेस्ट रिपोर्ट दिलेला नव्हता व दि. ७–८–२००७ रोजीच दिला असे सांगितले. अर्जदाराने मांडलेले काही मुद्‌दे विसंगत व विपर्यास करणारे आहेत असे त्यांचे म्हणणे होते व रक्कम भरलेले इतर शेती पंप गटांची कामे होणे अद्याप प्रलंबित असलेने श्री. नलवडे यांचा समावेश असलेल्या ग्रुपमधील शेती पंपांचा विचार करता तक्रारदाराचे वीज कनेक्शनला विलंब झालेला नाही असे सांगितले.

वि.प. यांनी श्री. ब्रम्हदेव दगडू नलवडे यांचे शेती पंपास कनेक्शन ३ महिन्यात करून देणार असलेचे सांगितले. गटातील इतर सहका–यांचीही वीज कनेक्शन मिळावे ही तक्रार उद्‌भवण्याची शक्यता वर्तविली.

मागणी केलेल्या ५ एच.पी. कनेक्शनसाठी वि.प. ने निर्देशित केलेली रक्कम भरली असल्याचा पुरावा दिसून येत आहे. त्याचप्रमाणे पाठपुरावा म्हणून लेखी स्वरूपातील अर्जही तक्रारदाराने केल्याचे दिसते. ग्राहकाने सुनावणीच्यावेळी कथन केल्याप्रमाणे प्रत्यक्षात भेटूनही आपली मागणी मांडल्याचे लक्षात येते. तथापि वि.प.ने मुद्‌देनिहाय अभिप्रायासोबत याचे ठोस पुरावे अगर कागदपत्रे सादर करता आली नाहीत. वि.प.ना मंचाने पुरावे व कागदपत्रे हजर करण्यासाठी तशी मुदतही दिली होती. ग्राहकालाही आपल्या मागणीच्या पृष्टयर्थ ठोस पुरावे (कागदपत्रे) दाखल करण्यास सांगितले होते ते दोघांकडूनही झालेले नाही.

दि. १८–१०–२००२ रोजी वि.प.ने सांगितलेली रक्कम ग्राहकांने भरणा केल्यावर वि.प. कडून जोडणी देण्याविषयी कोणते प्रयत्न झाले हे समजून येत नाही. तपासणी अहवाल मिळाल्यावर अर्ज पूर्ण झाला व त्यानंतर पुरवठा संहितेप्रमाणे वीज पुरवठा केला जाईल हे वि.प. चे म्हणणे योग्य नाही. आपल्याकडे मटेरिअल नाही हे माहीत असूनही ग्राहकांकडून रक्कम भरून घेतलेली आहे. जर तपासणी अहवाल द्यावयाचा झाल्यास विद्युत मोटार व इतर साहित्य ग्राहकास खरेदी करावे लागणार व त्याची ती गुंतवणूक विनाकारण होईल म्हणून वि.प.ने तपासणी अहवाल मागितला नाही असे मुद्‌देनिहाय अभिप्रायामध्ये नमूद केले आहे. म्हणजेच एकीकडे तपासणी अहवाल मिळाल्यानंतरच अर्ज पूर्ण झाला व त्यानंतरच पुरवठा संहितेप्रमाणे योग्य कालावधीत जोडणी देण्यात येईल असे नमूद करावयाचे व दुसरीकडे जोडणीचे जाळे पूर्ण नसल्यामुळे तसेच प्रलंबित प्रकरणे पूर्ण करून नंतरच तक्रारदार ग्राहकाला जोडणी देता येईल व त्यामुळेच तपासणी अहवाल घेतला नाही असे नमूद करणे म्हणजे वि.प.चे वागणे 'आपल्या सोईप्रमाणे धोरण' असे आहे. मंच याच्याशी सहमत नाही.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने निर्णय करतांना तसेच सुनावणीच्यावेळी ग्राहक व वि.प. यांच्याकडील कागदपत्रे तसेच वस्तुस्थिती जाणून घेऊन तसे आपल्या निकालपत्रात स्पष्ट नोंदणी करणे आवश्यक आहे. तथापि कक्ष यंत्रणेस अद्यापही त्यांची जाणीव झालेली दिसत नाही. कक्षाने विनियम २००६ मधील ८.२ च्या तरतूदीनुसार दिलेला निर्णय पूर्ण नियमबाह्य व अयोग्य आहे तसेच निकालाची तारीख व ५ सप्टेंबर २००७ चे पत्र क्र. ६४११ पाहता पूर्ण चुकीच्या पध्दतीचा अवलंब कक्ष करीत असल्याचे स्पष्ट होत आहे.

सर्व कागदपत्रे, तक्रारदार व वि.प. यांनी केलले कथन याचा एकत्रित विचार करता मंचाच्या निदर्शनास खालील बाबी आल्या आहेत.

१) वि.प. यांच्याकडे प्रलंबित प्रकरणाची अद्ययावत यादी उपलब्ध नाही. जेणेकरून ग्राहकाला आपला क्रमांक कोणता आहे हे त्वरित लक्षात येईल. तशी यादी उपलब्ध नसल्यामुळे यामध्ये वि.प. ला अपयश आल्याचे दिसते.

२) जर मटेरिअल उपलब्ध नाही तर तक्रारदार ग्राहकापुरतीच कांही पर्यायी सोय करता येईल का? याचाही विचार केलेला दिसून येत नाही.

३) सुनावणीच्यावेळी मुदत देऊनही मंचाने मागणी केल्याप्रमाणे कागदपत्रे वि.प. ने हजर केलेली नाहीत.

४) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे कामकाज विनियमातील तरतूदीशी संगत नाही याचा प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो. ग्राहकाने आपल्या नुकसान भरपाई प्रित्यर्थ ठोस पुरावे मंचासमोर दाखल करणे आवश्यक होते तथापि मंचाने मागणी केल्यावर दि. १२–१२–२००७ रोजी टपालाने १९९९–२००० चा ७/१२ चा उतारा पाठविला. तसेच विद्युत मोटार खरेदी व इतर साहित्य खरेदीच्या पावत्यांची छायांकित प्रत देण्यास सांगितले होते तेही दिले नाही. त्यामुळे नुकसान भरपाई अगर इतर रक्कमेची मागणी फेटाळण्यात येत आहे.

सर्व कागदपत्रे व केलेल्या कथनांचा एकत्रित विचार करून मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१) अपिलदार श्री. नलवडे यांनी वीज कनेक्शनसाठी आवश्यक ती पूर्तता केली असलेने वि.प. यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे तरतुदीनुसार वि.प. यांनी ग्राहकाच्या शेती पंपास दि. २८–२–२००८ पर्यंत वीज पुरवठा करावा.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी करणेत यावी व तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतुदीनुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल “केशवा” बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व),मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

( एस.आर. बांबळे )
सदस्य–सचिव
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

सुनावणीचेवेळी तक्रारदार, वि.प. यांनी केलेले कथन आणि उपलब्ध कागदपत्रे यांचा विचार करता खालील प्रमाणे परिस्थिती दिसून येते.

१) वि.प. यांचेकडे कामे करीत असलेल्या नवीन कनेक्शनसाठी, रकमा भरलेल्या गटांची (ग्रुपस) ज्येष्ठता यादी अवलोकनार्थ मागितली असता ते उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे सदर कामाची प्रगती व ज्येष्ठते प्रमाणे कामे होत आहेत का ? याचा आढावा घेता आला नाही.

२) तक्रारदार यांनी भरपाई मागितलेली रकमांना व कारणांना आधार असलेचा पुरावा ते देऊ शकले नाहीत. सदर कारणास्तव भरपाई रक्कम रू. २५०००/– मिळण्याची मागणी फेटाळण्यात येत आहे.

३) एच.टी. एल.टी. वाहिनी, रोहित्र यांचे काम करून तक्रारदाराचे वीज कनेक्शन करून देणेस त्या गटात १३ सह. शेती पंप अर्जदार असताना वि.प.ने असमर्थता दर्शविली.

४) वि.प. यांनी पर्यायी व्यवस्था करून तक्रारदाराचे विद्युत कनेक्शन ३ महिन्यात देणेचे वि.प. कडून मान्य.

५) तक्रारदाराच्या शेतीचा ७/१२ पत्राने दि. १२–१२–२००७ रोजी मिळाला.

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच

"विद्युत भवन",ताराबाई पार्क, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर
दुरध्वनी क्र. ०२३१/२६६६००२, फॅक्स क्र. ०२३१/२६६६००१

---

महाराष्ट्र वीज नियामक आयोग
ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल(ओम्बुड्स्मन) विनियम–२००६

ग्राहक तक्रार क्र.१४८/२००७

नोटीस क्र.

तारीख :

# <u>नोटीस</u>

| | |
|---|---|
| १) श्री. गजेंद्र दत्तात्रय नागटिळक,<br>मु.विठ्ठलवाडी, पो. येडशी,<br>त. जि. उस्मानाबाद. | अपेलंट |
| **<u>विरूध्द</u>** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा<br>नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,<br>संवसु मंडळ कार्यालय, जुने मिल कंपाऊंड,<br><u>सोलापूर.</u><br>२) कार्यकारी अभियंता(संवसु)<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br><br>सं.व सु. विभाग<br>बार्शी, जिल्हा–सोलापूर.<br>३) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>सं.व सु. विभाग, उस्मानाबाद, जि. उस्मानाबाद<br>४) सहाय्यक अभियंता (संवसु),<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु ग्रामीण उपविभाग, बार्शी, जिल्हा–सोलापूर. | विरूध्द पक्षकार |

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे



१) ज्याअर्थी उपरोक्त तक्रारदाराने वीज ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर यांचेकडे वि.प. यांच्या निर्णयाविरूध्द अपील दाखल केले आहे आणि ज्याअर्थी महाराष्ट्र वीज नियामक आयोग विनियम २००५ चे तरतुदीनुसार ही नोटीस मिळाल्याच्या तारेखेपासून १५ दिवसाचे आंत वि.प. यांना तक्रारदाराचे तक्रारीबाबत मुद्‌दे–निहाय अभिप्राय देण्यास कळविले आहे.

२) त्याअर्थी उभय पक्षकार आपल्या बचावार्थ ज्या कागदपत्रावर अवलंबून राहणार आहेत त्याचे मुळ प्रतीसह व साक्षांकित प्रतीसह त्यांनी सुनावणी दिवशी हजर रहाण्याचे आहे.

३) पुढे अशी नोटीस देण्यात येते की, विरूध्द पक्षाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात जर तक्रारदाराला प्रतिउत्तर द्यावयाचे असल्यास वि.प. ने आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करण्याची आहेत.

४) सदर तक्रार निकालांत काढण्यासाठी वीज ग्राहक तक्रार निवारण मंचासमोर **दिनांक २१/०२/२००८** रोजी सकाळी ठीक **११:००** वाजता **म.रा.विद्युत वितरणा कंपनी मर्यादित, सं. व सु. विभागीय कार्यालय, प्रशासकीय इमारत, बार्शी, जि. सोलापूर** येथे सुनावणी ठेवण्यात आली आहे.

५) वरील कलम नं. १ मध्ये उल्लेखल्या प्रमाणे विप. यांनी मुदतीत मुद्‌दे–निहाय अभिप्राय सादर केले नाहीत किंवा त्या दिवशी वि.प. मंचासमोर समक्ष अगर तक्रारदार स्वत: किंवा अधिकृत प्रतिनिधीतर्फे हजर राहिले नाही तर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विनियम २००५) चे तरतुदीनुसार तुमच्या अनुपस्थितीत गुणवत्तेनुसार तक्रारीबाबतचा निर्णय करण्यांत येईल.

६) या तक्रारीतील दोन्ही बाजुच्या पक्षांनी बचावार्थ कागदपत्रांची तपासणी / पाहणी करण्याची लेखी मागणी केल्यास तशी तपासणी / पाहणी संबंधितांना मंचाने निश्चित केलेल्या सुनावणीचे दिवशी करतां येईल.

सदस्य–सचिव

ग्राहक तक्रार निवारण मंच, मराविविकंलि.,
कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर